33

कार्यालयीन उपस्थितीच्या अनियमिततेमध्ये वारंवार सातत्य असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर करावयाची कार्यवाही.

शु ध्दी प त्र क

---

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे [पूर्व] मुंबई-५१**
**शुध्दीपत्रक क्र.प्राधि/कार्यालयीन उपस्थिती/२०१७/4263 /प्र-१४ दिनांक 17 OCT 2017**

---

**वाचा: १)प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. प्राधि/उपस्थिती /२०१०/५८८७/प्र.१४-अ, दि. ३१/१२/२०१०**
**२)प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. प्राधि/कार्या. उपस्थिती /२०१६/५५० दि. २९/०१/२०१६**

---

प्राधिकरणाच्या संदर्भीय परिपत्रकान्वये प्राधिकरण विभाग व सर्व विभागीय मंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना उपस्थितीच्या वेळेबाबत वेळोवेळी विस्तृतपणे सूचना व निर्देशांचे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

तथापि, प्राधिकरण विभाग आणि प्रादेशिक मंडळाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ अधिकारी /कर्मचारी यांच्या रजा उपभोगण्याच्या पध्दतीत पुढीलप्रमाणे अनियमितता आढळून येत आहे. बहुतांश, कर्मचारी/अधिकारी यांची नैमित्तिक रजा उपभोगून शिल्लक नसल्यावर प्राधिकरण दि. २९/०१/२०१६ रोजीच्या परिपत्रकाचा संबंध जोडून १ दिवस अर्जित रजा वळती होईल या सबबीखाली विनाअनुमती गैरहजर राहतात. त्यामुळे कार्यालयीन कामामध्ये खोळंबा निर्माण होत असतो. किंबहुना, नैमित्तिक रजा शिल्लक नसल्यास १ दिवस अर्जित रजा वळती होईल या उद्देशाने कर्मचारी//अधिकारी यांना सवयीनुसार रजा उपभोगण्याची सवय झाली आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण दि. २९/०१/२०१६ रोजीच्या परिपत्रकामध्ये सुधारणा करुन पुढीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

प्राधिकरण दि. २९/०१/२०१६ रोजीच्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचे खाती असलेली १ नैमित्तिक रजा वळती करण्याची कार्यवाही, तसेच ३ पेक्षा अधिक प्रत्येक ३ वेळा उशिरा आल्यास (३:१) यानुसार प्रत्येकी १ नैमित्तिक रजा वळती करण्यात यावी. नैमित्तिक रजा शिल्लक नसल्यास अर्जित रजेमधून ०१ अर्जित रजा वळती करावी. **या मुद्दयाऐवजी**

**जे अधिकारी/कर्मचारी यांचे ३ पेक्षा अधिक प्रत्येक ३ वेळा उशिरा आल्यास (३:१) यानुसार प्रत्येकी १ नैमित्तिक रजा वळती करण्यात यावी. नैमित्तिक रजा शिल्लक नसल्यास रजा विनावेतन करावी. सदर रजा अर्जित रजेतून वजावट होणार नाही.**

**तसेच ज्या अधिकारी/कर्मचा-यांची नैमित्तिक रजा शिल्लक नसतानाही त्यांनी १-२ दिवसांच्या किरकोळ रजा उपभोगल्या असतील तर त्या रजा विनावेतन मंजूर करण्यात येतील. त्यांची १-२ दिवसाची रजा जमा अर्जित रजेतून वजावट होणार नाही. किमान ३ व त्यापेक्षा जास्त दिवसाची नियमाप्रमाणे अर्जित रजा मंजूर करण्यात येईल.**

तरी सदर सुधारित परिपत्रक सर्व विभागप्रमुख/नियंत्रण अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून रजा उपभोगण्या बाबतच्या सुधारित सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यास आदेश देऊन कार्यवाही करावी.

( डॉ. बी. एन. बास्टेवाड )
सचिव/प्राधिकरण

F:\My Documents\ADM-14\All Leaves\Leave Order for Class 3 Staff.doc.- 228

ISSUED